पुढारी



लोणंद संशयितांनी घरफोडीतील संशयितांना अटक केली.

# चोरी, घरफोडीतील चौघे ताब्यात

**लोणंद : पुढारी वृत्तसेवा**

लोणंद पोलीस स्टेशन हद्दीत जबरी चोरी, घरफोडी व दुचाकी वाहन चोरी करणाऱ्या एका अल्पवयीन मुलासह चार संशयित आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सुनिल केशव भोसले (वय ४०, रा. कारकेल ता. बारामती), अंकुल रमेश भोसले (वय २०,रा. भुरकरवाडी ता. फलटण), महावीर रमेश भोसले (वय २०, दोघेही रा. भुरकरवाडी ता. फलटण) अशी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत.भोरकरवाडी व तरडगाव ता. फलटण येथे सपोनि विशाल वायकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोंबिंग ऑपरेशन राबवून एका अल्पवयीन मुलासह चौघांना ताब्यात घेतले. संशयितांकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे. संशयितांनी लोणंद पोलिस स्टेशनच्या हद्दीत केलेल्या पाच गुन्ह्यांची कबुली दिली आहे.या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक गणेश माने, स्वाती पवार, हवालदार संतोष नाळे, योगेश कुंभार, पोना सर्जे राव सूळ, श्रीनाथ कदम, फैय्याज शेख, विठठल काळे, अभिजीत घनवट, अविनाश शिंदे , अवधुत धुमाळ , केतन लाळगे, प्रिया धुरगुडे, मेघा ननावरे , मनिषा शिंदे यांनी सहभाग घेतला.

Satara Edition
Aug 23, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in